ePaper
मध्यपूर्वेतील संघर्षावर मोदींची सक्रिय कूटनीती; 3 देशांच्या प्रमुखांशी चर्चा



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज TM


पान 2 वरुन...

पुण्यात गुढीपाडव्याला वाहन खरेदीत उसळी

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 20 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## इराणचा कतारमधील सर्वात मोठ्या गॅस प्रकल्पावर हल्ला, ऊर्जा संकट वाढणार!

# भारतासमोरील अडचणी वाढणार?

**महाईन्यूज** I नवी दिल्ली

**कतारच्या सर्वात मोठ्या द्रवीकृत नैसर्गिक वायू (एलएनजी) प्रकल्प असलेल्या रास लफानवर इराणने क्षेपणास्त्र हल्ला केल्यानंतर जगावर ऊर्जा संकट अधिक गडद होण्याचा धोका निर्माण झाला आहे. जगातील सर्वात मोठ्या एलएनजी प्रकल्पावर हल्ला झाल्यामुळे आता या ठिकाणचे उत्पादन थांबविण्यात आले आहे. २८ फेब्रुवारी रोजी सुरू झालेले युद्ध आता २० दिवसांनी तेल युद्धात बदलले आहे. मागच्या २४ तासांत इराण आणि इस्रायलने जीवश्म इंधन ऊर्जेच्या उत्पादनाशी संबंधित प्रकल्पावर प्रथमच हल्ले सुरू केले आहेत. ज्यामुळे आता जागतिक पातळीवर ऊर्जा संकट उभे राहण्याची शक्यता आहे. त्यातही भारतावर याचा वाईट परिणाम होऊ शकतो असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.**



भारत ८८ टक्क्यांपेक्षा जास्त कच्चे तेल आयात करतो. तर गॅस आयातीवर भारताचे अवलंबित्व ५० टक्क्यांहून अधिक आहे. कतारकडून भारतात सर्वाधिक गॅस आयात होतो. युद्धामुळे गॅस आयात आधीच विस्कळीत झाली होती. भारताच्या एकूण एलपीजी (द्रवीकृत पेट्रोलियम गॅस) गॅसपैकी कतारमधून एक तृतीयांश आयात होते, तर एलएनजीची (द्रवीकृत नैसर्गिक वायू) ५० टक्के आयात कतारमधून होते.

कतारमधील गॅस उत्पादन प्रकल्पाला लक्ष्य केल्यामुळे भारताच्या आयातीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे भारताला आपला वायू वापर कमी करावा लागू शकतो. भारतात सध्या दैनंदिन नैसर्गिक वायूचा वापर १८९ दशलक्ष मेट्रिक मानक घनमीटर प्रतिदिन (MMSCMD) आहे. यापैकी ९७.५ दशलक्ष मेट्रिक मानक घनमीटर वायूचे उत्पादन देशांतर्गत होते.

युद्धाच्या काही दिवसानंतर होर्मुझच्या सामुद्रधुनीतील अडथळ्यामुळे इंधनाची वाहतूक विस्कळित झाली. ही तुलनेने तात्पुरती चिंतेची बाब होती. पण आता कतारच्या रास लफान प्रकल्पावर झालेला हल्ला मोठी हानी आहे. कारण संघर्ष थांबल्यानंतरही उत्पादन सुरळीत होण्यास बराच काळ लागेल.

युद्ध संपल्यानंतर रास लफान प्रकल्पावर झालेल्या इराणी हल्ल्यातील नुकसानाच्या प्रमाणावर भारतापुढील समस्या अवलंबून असतील. या प्रकल्पातून होणारा एलएनजी आणि पीएनजीचा पुरवठा हा प्रकल्पाच्या दुरूस्तीवर अवलंबून असेल.

### देशाच्या सार्वभौमत्वावर हल्ला : कतार

या घटनेनंतर कतारने इराणच्या या कृत्याचा तीव्र निषेध केला असून, हा देशाच्या सार्वभौमत्वावर हल्ला असल्याचे म्हटले आहे. प्रत्युत्तर म्हणून कतारने इराणच्या लष्करी आणि सुरक्षा अधिकाऱ्यांना २४ तासांच्या आत देश सोडण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, संयुक्त अरब अमिरातीच्या (UAE) हबशान गॅस सुविधेवरही क्षेपणास्त्राचे अवशेष पडल्याने कामकाज बंद करावे लागले. तसेच सौदी अरेबियानेही आपल्या पूर्व भागात ड्रोन हल्ला उधळून लावल्याचा दावा केला आहे.

## गॅस पुरवठ्यावर काय परिणाम होणार?

होर्मुझच्या सामुद्रधुनीतील तणावामुळे कतारचा उर्वरित जगाशी संपर्क आधीच तुटलेला आहे. कोलंबिया युनिव्हर्सिटीचे फेलो इरा जोसेफ यांच्या मते, आता कतारचा गॅस पुरवठा या वर्षाच्या मध्यापर्यंत पुन्हा सुरू होणे कठीण दिसत आहे. याचा सर्वाधिक फटका वीज निर्मितीसाठी आयातीवर अवलंबून असणाऱ्या आशिया आणि युरोपातील देशांना बसणार आहे.

## गॅसफिल्डवरील हल्ल्यानंतर इराण आक्रमक

इस्रायलने इराणच्या सर्वात मोठ्या साउथ पार्स गॅस फिल्डवर हल्ला केल्यानंतर त्याच्या प्रत्युत्तरात इराणने कतारच्या वायू प्रकल्पाला लक्ष्य केले. कतार, यूएई आणि सौदी अरेबियातील ऊर्जा प्रकल्पांना लक्ष्य केले जाईल, असा इशाराही इराणने दिला होता. विशेष म्हणजे इराणचा साउथ पार्स गॅस प्रकल्पही भारतासाठी महत्त्वाचा आहे. इथूनही भारताला एलएनजीचा पुरवठा होत असतो. इस्रायलच्या साउथ पार्सवरील हल्ल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेला या हल्ल्यापासून दूर ठेवले आहे. हा हल्ला पूर्णपणे इस्रायलचा निर्णय असल्याचा दावा त्यांनी केला.

# पुण्यात गुढीपाडव्याला वाहन खरेदीत उसळी

## 13 हजारांहून अधिक वाहनांची नोंदणी; इलेक्ट्रिक वाहनांनाही मोठी पसंती

**महाईन्यूज । पुणे**

**साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढीपाडव्यानिमित्त यंदा पुणेकरांनी वाहन खरेदीला मोठ्या प्रमाणावर पसंती दिल्याचे चित्र पाहायला मिळाले. प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, 13 हजारांहून अधिक वाहनांची खरेदी झाल्याचे समोर आले आहे. यानुसार इंधनावरील 11,937 वाहने, तर इलेक्ट्रिकवरील 1,530 नव्या वाहनांची नोंद गुढीपाडव्यानिमित्त पुण्यात झाली आहे.**



### वाहन खरेदीची आकडेवारी

इंधनावरील वाहने - इलेक्ट्रिक वाहने
दुचाकी: 7,986 - 1276
चारचाकी: 2,660 - 226
टुरिस्ट टॅक्सी: 287 - 12
बस: 44 - 00
ऑटोरिक्षा: 267 - 08 - 457 - 05
थ्री-व्हीलर: 69 - 03
ट्रॅक्टर: 00 - 00
इतर वाहने: 00 - 00
**एकूण इंधनावरील वाहने: 11937**
**एकूण इलेक्ट्रीक वाहने: 1530**

आरटीओने दिलेल्या माहितीनुसार, यंदाच्या गुढीपाडवा काळात म्हणजेच दि. 7 ते 17 मार्च 2026 या कालावधीत 11,937 इंधनावरील, तर 1,530 इलेक्ट्रिक, अशा एकूण 13 हजार 447 नव्या वाहनांची पुणेकरांनी खरेदी केली आहे. त्याची नोंदणी प्रक्रिया पुणे आरटीओ कार्यालयांत गेल्या आठवडाभरापासून सुरू होती. पुणेकरांना वाहने वेळेत मिळावीत, वाहनांच्या नोंदणी प्रक्रियेचे काम वेळेत व्हावे, यासाठी आरटीओ कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारीवर्गाने प्रयत्न केले.

गुढीपाडव्याच्या दिवशी शोरूममध्ये होणारी प्रचंड गर्दी आणि कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी लागणारा वेळ टाळण्यासाठी अनेक पुणेकरांनी स्मार्ट पर्याय निवडला. यंदा अनेक वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकांनी गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येलाच आपल्या आवडत्या वाहनांची डिलिव्हरी केल्याचे दिसून आले. पाडव्याच्या दिवशी सकाळी लवकर गुढी उभारून नवीन वाहनाची पूजा करता यावी, यासाठी आम्ही आदल्या दिवशीच गाडी घरी नेत असल्याचे या वेळी अनेक ग्राहकांनी सांगितले.



> गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर वाहन खरेदीसाठी पुणेकरांमध्ये मोठा उत्साह असतो. यंदा आम्ही नोंदणीची प्रक्रिया सुलभ केली होती. त्यामुळे ऐन पाडव्याच्या दिवशी नागरिकांना त्यांच्या वाहनांची डिलिव्हरी घेणे सोपे होईल, यासाठी प्रयत्न करण्यात आले. यंदा इंधनावरील आणि इलेक्ट्रिकवरील 13 हजार 447 नव्या वाहनांची नोंदणी पुणे आरटीओ कार्यालयात करण्यात आली आहे.
> - स्वप्निल भोसले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे.

---

## शिरुर तालुक्यात 12 वर्षीय मुलाचा खून; 21 महिन्यांपूर्वीच्या घटनेशी साम्य

**महाईन्यूज । पुणे**

**दहिवडी (ता. शिरूर) येथील मांजरेवस्ती येथे 12 वर्षीय मुलाचा खून झाल्याची घटना मंगळवारी (दि. 17) घडली. साईराज गणेश मांजरे असे खून झालेल्या बालकाचे नाव आहे. शिक्रापूर पोलिसांनी याप्रकरणी अक्षय दत्तात्रय मांजरे (वय 22, रा. मांजरेवस्ती, दहिवडी, ता. शिरूर) याला अटक केली आहे. शिक्रापूर पोलिस ठाण्यात याबाबत गणेश जयसिंग मांजरे (वय 38, रा. मांजरेवस्ती, दहिवडी, ता. शिरूर) यांनी फिर्याद दिली आहे.**



### ...तर यशला देखील मिळाला असता न्याय

दहिवडी येथील साईराज मांजरे याच्या घटनेचे गांभीर्य ओळखून शिक्रापूर पोलिसांनी घटनेचा छडा लावला. त्याचप्रकारे 21 महिन्यांपूर्वी यश गायकवाडच्या प्रकरणाचे तत्कालीन तपासी अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक केशव वाबळे यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तपास केला असता, तर यश गायकवाडला देखील न्याय मिळाला असता, अशी भावना स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दहिवडी (ता. शिरूर) येथील साईराज गणेश मांजरे हा 12 वर्षीय बालक मंगळवारी (दि. 17) दुपारी घरातून गेला. मात्र, पुन्हा घरी न आल्याने कुटुंबीयांनी त्याचा शोध घेतला असता घरापासून काही अंतरावर साईराजचा मृतदेह मिळाला. घटनेची माहिती मिळताच शिरूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले, पोलिस निरीक्षक दीपरतन गायकवाड, शिरूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, काही दिवसांपूर्वी यश गायकवाडचा देखील अशाच पद्धतीने मृत्यू झाला होता व त्याचे कारण समोर आले नसल्याचे नागरिकांनी सांगितले.



दरम्यान, पोलिसांनी ही घटना वन विभागाच्या माथी मारल्याचा आरोप येथील नागरिकांनी केला असून, या प्रकरणात खुनाचा गुन्हा नोंद करा, तेव्हाच आम्ही मृतदेह हलवू, अशी आक्रमक भूमिका घेतल्याने पोलिसांनी स्थानिकांचा रोष लक्षात घेत घटनास्थळीच फिर्याद घेत अज्ञातावर खुनाचा गुन्हा दाखल केला. दरम्यान, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग व शिक्रापूर पोलिस घटनेचा तपास करीत असताना पोलिसांना संशयित अक्षय मांजरे याच्याबाबत माहिती मिळाली. पोलिसांनी त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर व पोलिसी खाक्या दाखविल्यावर त्याने हा खून केल्याची कबुली दिली. पोलिसांनी अक्षय दत्तात्रय मांजरे याला अटक केली आहे.

### तब्बल 21 महिन्यांपूर्वीच्या घटनेला उजाळा

विशेष म्हणजे, 21 महिन्यांपूर्वी 21 जून 2024 रोजी यश गायकवाड या बालकाचा डोक्यावर जखम असलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आलेला असताना त्याच ठिकाणी त्याच शेतात व त्याच विहिरीच्या कडेला त्याच पद्धतीने डोक्यावर जखम असलेल्या अवस्थेत खून झालेल्या बालकाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

# थेरगाव कलात्मक सौंदर्याने बहरले

## स्वच्छतेतून दिला जातोय सुंदरतेचा संदेश; आरोग्य विभागाचा अभिनव उपक्रम

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**जागतिक पुनर्वापर दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने राबविलेला ‘वेस्ट टू आर्ट’ हा उपक्रम थेरगाव परिसरात नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरत आहे. ग क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. २३ मधील संजीवनी कॉर्नर येथे टाकाऊ वस्तूंमधून साकारलेल्या आकर्षक कलाकृतींनी परिसर अक्षरशः बहरून गेला आहे.**




> ‘वेस्ट टू आर्ट’ यासारखे उपक्रम शहराच्या सौंदर्यात भर घालतात त्याचबरोबर, नागरिकांमध्ये स्वच्छता आणि वसुंधरेबाबतची जाणीव अधिक दृढ करतात. प्रत्येकाने टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करून आपल्या परिसराला सुंदर आणि स्वच्छ ठेवण्याचा संकल्प करावा.
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

> आपल्या कचराचे योग्य व्यवस्थापन केल्यास तो एक संसाधन ठरू शकतो. ‘वेस्ट टू आर्ट’ आणि आर.आर. आर.सारख्या अनोख्या व अभिनव उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये वसुंधरापूरक सवयी रुजण्यास त्याची मदत होत असून, स्वच्छ आणि शाश्वत पिंपरी चिंचवड शहरासाठी प्रत्येक नागरिकाचा सक्रीय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.
> - डॉ.विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

पिंपरी चिंचवड महापालिकेचे महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांच्या अधिपत्याखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून “कमी वापर, पुनर्वापर आणि पुनर्चक्रण (आर.आर.आर.) या संकल्पनेचा प्रभावी संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

टाकाऊ वस्तूंना नवसंजीवनी देत परिसराचे आकर्षक पद्धतीने सुशोभीकरण करण्यात आले असून, स्वच्छता आणि सर्जनशीलतेचा सुंदर संगम थेरगाव येथे आता पहायला मिळत आहे.

आर.आर.आर. सेंटर आणि ‘वेस्ट टू आर्ट’सारख्या अभिनव उपक्रमांमुळे शहरात पर्यावरणपूरक जीवनशैलीला चालना मिळत आहे. नागरिकांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्वच्छतेच्या चळवळीत सक्रिय सहभाग नोंदविला.

क्षेत्रीय अधिकारी किशोर ननावरे, सहाय्यक आरोग्य अधिकारी अतुल सोनवणे, आरोग्य निरीक्षक गोपाल धस आणि गणेश राजगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

यावेळी उपस्थित नागरिकांना ओला व सुका, घरगुती घातक, सॅनिटरी कचरा वेगळा करून पालिकेच्या घंटागाडीत देण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच स्वच्छता आणि वसुंधरा संवर्धनासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले.

टाकाऊ वस्तूंचा सुयोग्य पुनर्वापर केल्यास परिसराचे सौंदर्य खुलते आणि स्वच्छतेच्या माध्यमातून शहर विकासाची दिशा ठरते असे मत सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांनी व्यक्त केले.

# महापालिकेच्या वतीने ‘गुढीपाडवा पट वाढवा’ अभियानाचा शुभारंभ

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**‘गुढीपाडवा – पट वाढवा’ हे अभियान केवळ प्रवेश वाढविण्यापुरता मर्यादित नसून, प्रत्येक मुलापर्यंत दर्जेदार आणि सर्वसमावेशक शिक्षण पोहोचविण्याचा एक व्यापक प्रयत्न आहे. महापालिका शाळांमधील आधुनिक सुविधा, समर्पित शिक्षकवर्ग आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रम यांच्या बळावर शिक्षणाची भक्कम पायाभरणी होत आहे,त्यामुळे अधिकाधिक पालकांनी या गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्थेवर विश्वास ठेवून आपल्या पाल्यांचा महापालिका शाळांमध्ये प्रवेश घ्यावा, तसेच या शैक्षणिक चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले.**



> पिंपरी चिंचवड शहरातील महापालिका शाळा केवळ शैक्षणिक गुणवत्तेपुरत्या मर्यादित नसून, विविध उपक्रम आणि आधुनिक अध्यापन पद्धतींचा अवलंब करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहेत. काही विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा क्षेत्रातील विशेष कौशल्य आढळून येते. अशा विद्यार्थ्यांना लहान वयापासून योग्य प्रशिक्षण, पोषण आणि मार्गदर्शन दिल्यास ते राज्य व राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवू शकतात.
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

राज्य शासनाच्या सूचनेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चिखली येथील म्हेत्रेवाडी शाळा क्र. ९३ येथे गुढीपाडव्याच्या निमित्ताने “गुढीपाडवा पट वाढवा” या विशेष प्रवेश अभियानाचा शुभारंभ आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी नव्याने शाळेत शाळेत प्रवेश घेऊन आपल्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात करणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत आयुक्त यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

याप्रसंगी शिक्षण समिती सभापती रविना अंगोळकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, नगरसदस्य यश साने, नगरसदस्या रिटा सानप, प्रियंका कुदळे, माजी नगरसदस्य सचिन सानप, शिक्षण विभागाच्या उप आयुक्त ममता शिंदे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, मुख्याध्यापिका स्नेहल मोरे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह शाळेतील शिक्षिका, कर्मचारी आणि विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, गुढीपाडवा हा आपल्या संस्कृतीतील नवचैतन्य, नव्या सुरुवातीचा सण आहे. याच शुभमुहूर्तावर ‘गुढीपाडवा पट वाढवा’ या उपक्रमाचा शुभारंभ करताना मला विशेष आनंद होत आहे. राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणारा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून, शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणणारा आहे.कोल्हापूर जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असताना अशाच स्वरूपाचा उपक्रम राबविण्यात आला होता. त्यावेळी नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प आणि मिठाई देऊन स्वागत करण्यात येत असे. त्या छोट्याशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल आपुलकी निर्माण झाली आणि पालकांचा विश्वासही वाढला. आज हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात व्यापक स्वरूपात राबविला जात असल्याचा मला आनंद आहे.अनेकदा महापालिका शाळांबाबत पालकांध्ये गैरसमज आढळून येतात. मात्र, प्रत्यक्षात या शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रम प्रभावीपणे राबविले जातात. या सकारात्मक बाबींची माहिती पालकांपर्यंत पोहोचविणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणे ही महापालिका शाळांची विशेषता आहे.विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यावर अधिक भर दिल्यास निश्चितच पटसंख्या वाढण्यास मदत होईल. माझ्या स्वतःच्या शालेय जीवनात मला ६ ते ८ रुपयांची शिष्यवृत्ती मिळायची. त्या छोट्याशा रकमेनेही शिक्षणाबद्दलची प्रेरणा वाढत असे. त्यामुळे अशा योजनांचा विद्यार्थ्यांच्या आयुष्यावर दीर्घकालीन सकारात्मक परिणाम होतो, यावर माझा ठाम विश्वास आहे.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमध्ये कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक आणि कर्मचारी अत्यंत कुशल, समर्पित आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी कटिबद्ध आहेत. विशेषतः म्हेत्रेवाडी येथील शाळेतील महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण लक्षणीय असून, त्यांचे योगदान शिक्षण व्यवस्थेला अधिक सक्षम बनवते. माझी आई देखील मुख्याध्यापिका होती, त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील जबाबदाऱ्या आणि मूल्यांची मला जाणीव आहे, महापालिका शाळांचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी आणि पटसंख्या वाढविण्यासाठी आम्ही लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि नागरिक यांच्या समन्वयातून ‘गुढीपाडवा पट वाढवा’ हा उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येईल असेही आयुक्त डॉ. सूर्यवंशी म्हणाले.



## भूमिका

# पाकिस्तान... अफगाणिस्तान... कब्रस्तान!



**विधिनिषेधशून्य परराष्ट्र धोरण, धर्मांधतेचा अतिरेक आणि शेजाऱ्यांच्या अंतर्गत बाबींमध्ये सातत्याने हस्तक्षेप—या तीन गोष्टींचा परिणाम काय होतो, याचे ज्वलंत उदाहरण आज अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यातील बिघडलेले संबंध आहेत. एकेकाळी परस्परांच्या मदतीने राजकीय समीकरणे बदलणारे हे दोन देश आता उघड संघर्षाच्या उंबरठ्यावर उभे आहेत.**

पाकिस्तानने अनेक दशकांपासून अफगाणिस्तानात अस्थिरता निर्माण करण्याचे धोरण अवलंबले. तालिबानसारख्या गटांना पाठबळ देऊन स्वतःचे हितसंबंध साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, “परसात साप पाळले तर ते एक दिवस मालकालाच दंश करतात,” ही म्हण पाकिस्तानच्या बाबतीत खरी ठरताना दिसते. आज तेच तालिबान आणि त्यांचे उपगट, विशेषतः तेहरीक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी), पाकिस्तानसाठी मोठा डोकेदुखी ठरत आहेत.

अफगाण-पाकिस्तान सीमावर्ती भागात सतत तणाव निर्माण होत असून, पाकिस्तानकडून अफगाणिस्तानातील हल्ल्यांची मालिका सुरू आहे. या हल्ल्यांमुळे निरपराध नागरिकांचे प्राण जात आहेत, तर दुसरीकडे टीटीपीसारखे गट पाकिस्तानमध्ये दहशतवादी कारवाया करत आहेत. परिणामी, दोन्ही देशांत अविश्वास आणि संघर्ष अधिकच तीव्र होत आहे.

इतिहास पाहिला तर अफगाणिस्तान हा “महासत्तांचे कब्रस्तान” म्हणून ओळखला जातो. ब्रिटन, रशिया आणि अमेरिकेसारख्या शक्तिशाली देशांनाही येथे अपयशाचा सामना करावा लागला आहे. तरीही पाकिस्तानने या वास्तवाकडे दुर्लक्ष करून अफगाणिस्तानात हस्तक्षेप करण्याचे धोरण कायम ठेवले. यामागे दीर्घकालीन राष्ट्रीय धोरणाचा अभाव आणि अल्पदृष्टी स्पष्ट दिसते.

दुसरीकडे, भारताने स्वातंत्र्यानंतर धर्मनिरपेक्षता, लोकशाही आणि विकासाच्या मूल्यांवर आधारित वाटचाल केली. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांवर भर देत देश उभारणीला प्राधान्य दिले. पाकिस्तान मात्र लष्करी वर्चस्व, शस्त्रसाठा आणि धार्मिक अतिरेक यामध्येच अडकून राहिला. परिणामी, त्याची अर्थव्यवस्था डळमळीत झाली आणि अंतर्गत अस्थिरता वाढली.

आज पाकिस्तानसमोर दुहेरी आव्हान उभे आहे—एकीकडे अफगाणिस्तानातील संघर्ष आणि दुसरीकडे बलुचिस्तानातील बंडखोरी. आर्थिक संकट, इंधनटंचाई आणि वाढते कर्ज यामुळे देश आधीच अडचणीत आहे. अशा परिस्थितीत युद्धखोरीचे धोरण अधिकच घातक ठरू शकते.

या पार्श्वभूमीवर भारतासाठीही हा विषय महत्त्वाचा ठरतो. अफगाणिस्तानाशी संबंध सुधारण्याच्या दिशेने भारताने पावले उचलली असताना, या भागातील अस्थिरता दीर्घकालीन दृष्टीने धोकादायक ठरू शकते. त्यामुळे परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

एकूणच, धर्मांधता, हस्तक्षेप आणि आक्रमक धोरण यांचा शेवट नेहमीच विनाशात होतो, हे पाकिस्तान-अफगाणिस्तान संबंध स्पष्टपणे दाखवतात. एकेकाळी सहयोगी असलेले हे देश आज परस्परांचे “कब्रस्तान” बनण्याच्या मार्गावर आहेत—हीच या प्रदेशाची शोकांतिका आहे.

## प्रासंगिक »

### लोभी कुत्रा

***एकदा एक कुत्रा खूप भुकेला होता. तो दिवसभर अन्नाच्या शोधात भटकत होता, पण त्याला काहीच मिळाले नाही.***

एकदा एक कुत्रा खूप भुकेला होता. दिवसभर फिरूनही त्याला काही खायला मिळाले नव्हते. शेवटी त्याला रस्त्यावर एक पोळी सापडली. ती तोंडात धरून तो आनंदाने चालत निघाला. थोड्या वेळाने तो एका पुलावर पोहोचला. पुलाखाली स्वच्छ पाणी वाहत होते.

कुत्र्याने खाली पाहिले असता त्याला पाण्यात स्वतःचेच प्रतिबिंब दिसले. पण त्याला वाटले की दुसरा कुत्रा पोळी घेऊन उभा आहे. त्या पोळीचा लोभ त्याला झाला. “त्याची पोळीही मिळाली तर?” असा विचार करून त्याने त्या ‘कुत्र्यावर’ भुंकण्यासाठी तोंड उघडले.

जसेच त्याने तोंड उघडले, तसे त्याच्या तोंडातील पोळी पाण्यात पडली आणि वाहून गेली. शेवटी त्याच्याकडे काहीच उरले नाही.

**तात्पर्य-** अति लोभ केल्याने नुकसान होते. जे आहे त्यात समाधान मानले, तरच खरे सुख मिळते.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अनिश्चित आणि लहरी धोरणांच्या पार्श्वभूमीवर भारताने अमेरिकेशी होत असलेला व्यापार करार स्थगित करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत योग्य आणि दूरदर्शी ठरतो.

# ‘मागा’सांची मोहक मरगळ!



जागतिक पातळीवर वाढती अस्थिरता आणि अमेरिकेच्या भूमिकेतील विसंगती पाहता, भारताने स्वतःच्या आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य दिले, हे स्पष्ट होते.

अलीकडील इराण–इस्रायल संघर्षात अमेरिकेची भूमिका गोंधळलेली दिसली. स्पष्ट रणनीतीशिवाय युद्धात सहभाग, त्यानंतर इतर देशांकडून मदतीची अपेक्षा आणि परिस्थिती बिघडल्यावर भूमिका बदलणे—या सर्व गोष्टींमुळे अमेरिकेच्या नेतृत्वक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अशा स्थितीत दीर्घकालीन व्यापार करार करणे धोकादायक ठरू शकते.

ट्रम्प यांच्या कारकीर्दीत आयातशुल्काच्या धोरणांमध्ये सातत्याचा अभाव आहे. वारंवार बदलणारे करदर उद्योग आणि व्यापारासाठी अनिश्चितता निर्माण करतात. त्यामुळे “आधी कररचना स्पष्ट करा, मगच करार” ही भारताची भूमिका व्यावहारिक ठरते. स्थिर धोरणांशिवाय कोणताही आर्थिक करार टिकाऊ ठरू शकत नाही.

याच वेळी नाटो संदर्भात युरोपीय देशांनी घेतलेली भूमिका महत्त्वाची आहे. जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड आणि इटली यांनी अमेरिकेच्या दबावाला न जुमानता स्वतंत्र भूमिका घेतली. “हे युद्ध आमचे नाही” असे स्पष्ट सांगत त्यांनी अमेरिकेच्या अपेक्षांना धुडकावले. यावरून युरोप अमेरिकेच्या प्रभावातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसते.

एकेकाळी जागतिक नेतृत्व करणारी अमेरिका आज अंतर्गत विसंगती आणि बाह्य धोरणातील अस्थिरतेमुळे अडचणीत सापडलेली आहे. माध्यमांवरील टीका, मित्रदेशांशी तणाव आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कमी होत चाललेला विश्वास—या सर्व गोष्टी तिच्या प्रतिमेला धक्का देत आहेत.

या पार्श्वभूमीवर भारताने घेतलेली भूमिका ही केवळ स्वाभिमानाची नाही, तर व्यावहारिक राजकारणाचीही आहे. बदलत्या जागतिक परिस्थितीत स्वतःचे हित जपणे आणि ठोस धोरणांवर आधारित निर्णय घेणे हीच यशस्वी परराष्ट्र नीतीची गुरुकिल्ली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



**समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ।**
**तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥**

**आणीक न लगे मायिक पदार्थ ।**
**तेथें माझें आर्त्त नको देवा ॥ध्रु.॥**

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राज्यात आणखी दोन दिवस पावसाचा जोर; अनेक भागांना पिवळा इशारा...

## विदर्भ, मराठवाडा व मध्य महाराष्ट्रात वादळी पाऊस व गारपीट

**महाईन्यूज । मुंबई**

**सध्या राज्यातील विविध भागांत सुरू असलेला उन्हाळी पाऊस आणि गारपिटीच्या घटना आणखी दोन दिवस कायम राहण्याचा अंदाज आहे. त्यानंतर हवामान कोरडे होऊन पुन्हा तापमानात वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.**



विदर्भापासून मध्य महाराष्ट्रापर्यंत हवेची द्रोणीय स्थिती निर्माण झाल्यामुळे बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्रातून बाष्पीयुक्त वारे राज्याच्या दिशेने येत होते. त्यामुळे राज्याच्या बहुतांश भागात वादळी वाऱ्यासह उन्हाळी पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीच्या घटना घडल्या. आणखी दोन दिवस विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात उन्हाळी पाऊस आणि तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. त्यानंतर हवामान कोरडे राहण्याचा अंदाज आहे.

उन्हाळी पाऊस पावसामुळे राज्याला वाढत्या तापमानापासून काहीसा दिलासा मिळाला आहे. विदर्भात चाळीस अंशावर गेलेले कमाल तापमान ३८ अंश सेल्सिअसवर आले आहे. मात्र पाऊस उघडताच आणि ढगाळ हवामान कमी होऊन आकाश निरभ्र होताच पुन्हा तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे.

### शेती पिकाचे मोठे नुकसान

राज्यभरात उन्हाळी पाऊस सुरू असल्यामुळे काढणीला आलेल्या रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. तसेच अखेरच्या टप्प्यात असलेल्या द्राक्ष हंगामाला मोठा फटका बसत आहे. बेदाणा निर्मितीवर परिणाम होऊन, बेदाणा काळा पडण्याच्या घटना घडत आहेत. कोकण किनारपट्टी आणि मराठवाड्यातील आंबा पिकाचे नुकसान होत आहे. वादळी वाऱ्यामुळे आंबा गळून पडत आहे. गारपिट झाल्यामुळे आंबा, द्राक्ष, केळी, काकडी, कलिंगड, पपई सारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होताना दिसून येत आहे.

# ५८ व्हिडिओंचा धक्कादायक दावा; पुरावे नष्ट होण्याची भीती

**महाईन्यूज । पुणे**

**भोंदूगिरी करणारा स्वयंघोषित ज्योतिषी आणि बलात्कार प्रकरणातील आरोपी अशोक खरात यांच्या ट्रस्टवर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर आहेत. त्या पदावर राहिल्या तर पुरावे नष्ट करण्याची भीती आहे. त्यामुळे रूपाली चाकणकर यांनी तातडीने पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) नेत्या रूपाली पाटील -ठोंबरे यांनी पत्रकार परिषदेत केली.**



राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी अशोक खरात यांची पाद्यपूजा केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. त्याबाबत रूपाली पाटील -ठोंबरे म्हणाल्या, हा विषय कोणत्याही पक्षाचा किंवा जातीचा नाही, हा पूर्णपणे महिलांचा विषय आहे. एक वर्षापूर्वीच या प्रकरणाची वाचा फुटली होती. तरीही राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांच्या ट्रस्टवर असल्यामुळे पोलिस कारवाई होत नव्हती का? ५८ व्हिडिओ सापडले आहेत, म्हणजे किमान ५८ महिलांवर अत्याचार झाला असण्याची शक्यता आहे.

रूपाली चाकणकर यांनी तातडीने पदाचा राजीनामा द्यावा, अन्यथा या प्रकरणाचा निष्पक्ष तपास होणार नाही. त्या पदावर राहिल्या तर पुरावे नष्ट करण्याची भीती आहे. सर्व संबंधित ट्रस्टवर गुन्हे दाखल व्हायला हवेत. जर रूपाली चाकणकर यांनी राजीनामा दिला नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलन करण्यात येईल. मी हा विषय सुनेत्रा पवार यांच्या कानावर घालणार आहे. संवैधानिक पदावर असलेल्या व्यक्तीमुळे तपास प्रभावित होऊ शकतो, त्यामुळे त्यांचा तातडीने राजीनामा घेण्यात यावा, असे रूपाली ठोंबरे यांनी सांगितले.

### ५८ व्हिडिओ प्रकरण तापले!

अशोक खरात प्रकरणात ५८ व्हिडिओंचा धक्कादायक दावा समोर आल्यानंतर राजकीय वातावरण तापले आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या ट्रस्टशी संबंधित असल्याने निष्पक्ष तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, पुरावे नष्ट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे चाकणकरांनी तातडीने राजीनामा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

# मध्यपूर्वेतील संघर्षावर मोदींची सक्रिय कूटनीती; तीन देशांच्या प्रमुखांशी चर्चा

## मॅक्रॉन, हैथम बिन तारिक आणि अन्वर इब्राहिम यांच्याशी चर्चा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**मध्यपूर्वेत वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी(दि.१९) फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, ओमानचे सुल्तान हैथम बिन तारिक आणि मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्याशी फोनवरून चर्चा केली. या चर्चेत प्रादेशिक संघर्ष कमी करून शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्यावर भर देण्यात आला.**



मिळालेल्या माहितीनुसार, तिन्ही नेत्यांशी झालेल्या चर्चेत मोदी यांनी संवाद आणि कूटनीतीच्या माध्यमातून तणाव कमी करण्याची गरज अधोरेखित केली. तसेच हॉर्मुज सामुद्रधुनीत सुरक्षित आणि अखंड तेल आणि गॅसवाहून जहाजांचे परिचालन अत्यावश्यक असल्याचे स्पष्ट केले.

ओमानचे सुल्तान हैथम बिन तारिक यांच्याशी झालेल्या चर्चेत मोदी यांनी ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच ओमानच्या सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेच्या उल्लंघनाचा निषेध पुन्हा व्यक्त करत भारतीय नागरिकांच्या सुरक्षित परतीसाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले.

विशेष म्हणजे, मध्यपूर्वेतील संघर्ष सुरू झाल्यानंतर सुल्तान यांच्याशी मोदी यांची ही दुसरी चर्चा आहे. मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्याशी बोलताना मोदी यांनी ईद-उल-फितरच्या शुभेच्छा दिल्या आणि मध्यपूर्वेतील परिस्थितीबाबत चिंता व्यक्त करत शांततेसाठी संवाद आवश्यक असल्याचे सांगितले. तर फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांच्याशी झालेल्या चर्चेत या संघर्षाबाबत जागतिक पातळीवरील चिंतेवर चर्चा झाली. विशेष म्हणजे, हा संघर्ष सुरू झाल्यापासून पंतप्रधान मोदींनी सौदी अरेबिया, बहरीन, संयुक्त अरब अमिराती, जॉर्डन, इस्रायल आणि इराणसह अनेक देशांच्या नेत्यांशीही चर्चा केली आहे.

### मोदींची कूटनीतिक हालचाल वाढली

मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फ्रान्स, ओमान आणि मलेशियाच्या नेत्यांशी दूरध्वनीवरून चर्चा केली. संवाद आणि कूटनीतीच्या माध्यमातून तणाव कमी करण्यावर त्यांनी भर दिला. तसेच हॉर्मुज सामुद्रधुनीत तेल-गॅस वाहतूक सुरक्षित ठेवण्याचे महत्त्वही अधोरेखित केले.

# ड्रोन युद्धात भारत 'सुपरपॉवर'कडे; स्वदेशी उत्पादनावर राजनाथ सिंहांचा भर

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**जागतिक आव्हाने सातत्याने वाढत आहेत. आधी रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध आणि आता इराण व इस्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे ड्रोनचे महत्त्व लक्षणीयरीत्या वाढले आहे, असे सांगत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही दोन्ही देशांमधील सुरू असलेल्या संघर्षांदरम्यान ड्रोनच्या गरजेवर भाष्य केले.**



भारताने एक मजबूत ड्रोन उत्पादन परिसंस्था विकसित केली पाहिजे, येत्या काही वर्षात आपल्याला ड्रोन उत्पादनाचे जागतिक केंद्र बनावे लागेल, असेही ते म्हणाले. दिल्लीत आयोजित राष्ट्रीय संरक्षण उद्योग संमेलन २०२६ ला संबोधित करताना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह गुरुवारी म्हणाले की, या दोन्ही प्रदेशांमधील सुरू असलेल्या संघर्षांनी ड्रोन आणि ड्रोनविरोधी तंत्रज्ञानाचे महत्त्व सिद्ध केले आहे. संपूर्ण जग रशिया आणि युक्रेन, तसेच इराण आणि इस्रायल यांच्यातील भीषण संघर्ष पाहत असताना, भविष्यातील युद्धांमध्ये ड्रोन आणि ड्रोनविरोधी तंत्रज्ञानाची महत्त्वपूर्ण भूमिका आपल्याला स्पष्टपणे दिसून येते.

राजनाथ सिंह म्हणाले, "आजच्या युगात भारताच्या संरक्षण सज्जतेसाठी आणि सामरिक स्वायत्ततेसाठी, भारताने ड्रोन निर्मितीमध्ये पूर्णपणे आत्मनिर्भर होणे अत्यावश्यक आहे." त्यांनी ड्रोन निर्मितीचे झपाट्याने वाढणारे महत्त्व, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स आणि इतर नवीन व महत्त्वपूर्ण तंत्रज्ञानाबद्दलही सांगितले.

"ऑटोमेशन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि रोबोटिक्स यांसारखे नवोपक्रम जागतिक स्तरावर उत्पादन क्षेत्रात परिवर्तन घडवत आहेत. यासोबतच सिम्युलेशन तंत्रज्ञानदेखील नवीन संधी निर्माण करत आहे." संरक्षण मंत्र्यांनी उद्योगातील आघाडीच्या कंपन्यांना त्यांच्या उत्पादनांची गुणवत्ता झपाट्याने सुधारण्यावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहनही केले, असेही सिंह म्हणाले.

### परिसंस्था निर्माण करणे अत्यावश्यक

ड्रोन निर्मितीच्या महत्त्वाबाबत बोलताना संरक्षण मंत्री म्हणाले, "रणनीतिक स्वायत्तता, संरक्षण सज्जता आणि आत्मनिर्भरतेसाठी स्वदेशी ड्रोन उत्पादनाची परिसंस्था आवश्यक आहे. आज भारतात एक अशी ड्रोन निर्मिती परिसंस्था निर्माण करण्याची गरज आहे, ज्यामध्ये आपण पूर्णपणे आत्मनिर्भर असू." या परिषदेला देशातील आघाडीच्या संरक्षण निर्मिती कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी, तसेच संरक्षण सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे अधिकारी उपस्थित होते.

## अंकिता वालवलकरने दिली गुढीपाडव्याला गुड न्यूज!




बिग बॉस मराठी' फेम आणि सोशल मीडियावर 'कोकण हार्टेड गर्ल' म्हणून ओळखली जाणारी अंकिता वालवलकर गेल्या काही दिवसांपासून तिच्या "गुड न्यूज"मुळे चर्चेत होती. चाहत्यांना ती आई होणार असल्याचा अंदाज होता; अखेर गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर अंकिताने स्वतःच या चर्चांना पूर्णविराम दिला आहे.अंकिता आणि तिचा पती कुणाल यांनी पनवेलमध्ये नवीन घर खरेदी केल्याची आनंदाची बातमी सोशल मीडियावर शेअर केली आहे. "ऑफिशिअली पनवेलकर" झाल्याचे सांगत तिने नव्या घराची झलक दाखवत काही खास फोटोही पोस्ट केले आहेत.कोकण हार्टेड गर्लने गुढीपाडव्याला दिली गुड न्यूज! नवऱ्यासोबत फोटो शेअर करत म्हणाली...कोकण हार्टेड गर्ल अंकिता वालावलकरने हक्काचं घर खरेदी केली असल्याची आनंदाची बातमी सोशल मीडियावरुन शेअर केली आहे.कोकण हार्टेड गर्लने गुढीपाडव्याला दिली गुड न्यूज! नवऱ्यासोबत फोटो शेअर करत म्हणाली...बिग बॉस मराठी' फेम आणि सोशल मीडियावर 'कोकण हार्टेड गर्ल' म्हणून ओळखली जाणारी अंकिता वालवलकर गेल्या काही दिवसांपासून तिच्या "गुड न्यूज"मुळे चर्चेत होती. चाहत्यांना ती आई होणार असल्याचा अंदाज होता; अखेर गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर अंकिताने स्वतःच या चर्चांना पूर्णविराम दिला आहे.अंकिता आणि तिचा पती कुणाल यांनी पनवेलमध्ये नवीन घर खरेदी केल्याची आनंदाची बातमी सोशल मीडियावर शेअर केली आहे.

## नॅशनल जिओग्राफिकच्या 'चेंजमेकर' यादीत आलिया भट्ट आणि प्रियंका चोप्राचा गौरव!

जगभरात समाजासाठी महत्त्वपूर्ण काम करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणारी नॅशनल जिओग्राफिकची '३३ चेंजमेकर' यादी २०२६ साठी जाहीर झाली आहे. या यादीत भारतातील दोन लोकप्रिय अभिनेत्री आलिया भट्ट आणि प्रियंका चोप्रा यांचा समावेश करण्यात आला आहे. समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी केलेल्या कामाची दखल घेत हा सन्मान देण्यात आला आहे.आलिया भट्टला पर्यावरण आणि हवामान बदलाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी या यादीत स्थान मिळाले आहे. गेल्या काही वर्षांत तिने पर्यावरण संरक्षणासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. तिच्या 'एड फाइंड्स अ होम' या मुलांसाठी लिहिलेल्या पुस्तकाद्वारे तिने प्राण्यांना दत्तक घेण्याचा संदेश दिला. तसेच, 'मी वॉर्डरोब इज सु वॉर्डरोब' या उपक्रमातून तिने स्वतःचे आणि इतर कलाकारांचे कपडे पुन्हा वापरासाठी उपलब्ध करून दिले. यामुळे फॅशन क्षेत्रात पुनर्वापराचा संदेश दिला गेला. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही आलिया सतत पर्यावरणपूरक जीवनशैलीचा प्रचार करत असते. दुसरीकडे, प्रियंका चोप्राला आरोग्य क्षेत्रातील कामासाठी सन्मानित करण्यात आले आहे. विशेषतः मधुमेहाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी तिने मोठे योगदान दिले आहे. प्रियंकाचा पती निक जोनस यांना लहानपणापासून टाइप-१ मधुमेह आहे. त्यामुळे या आजाराबद्दल जनजागृती करण्यासाठी दोघेही सक्रिय आहेत. त्यांनी 'बियॉन्ड टाइप १' या संस्थेच्या माध्यमातून भारतात आणि जगभरात लोकांपर्यंत योग्य माहिती पोहोचवण्याचे काम केले आहे. आरोग्य सेवा अधिक सुलभ करण्यासाठीही प्रियंका विविध उपक्रमांमध्ये सहभागी होत आहे.या यादीत फक्त भारतीय कलाकारच नाहीत, तर जगभरातील अनेक प्रसिद्ध व्यक्तींचा समावेश आहे. यात हॅरिसन फोर्ड, रसेल वेस्टब्रूक, शैलेन वुडली, इवान मॅकग्रेगर आणि इद्रिस एल्बा यांसारख्या नामांकित व्यक्तींचाही समावेश आहे. या सर्वांनी आपल्या क्षेत्रात काम करताना समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न केला आहे.एकंदरीत, या सन्मानामुळे भारतीय कलाकारांची जागतिक स्तरावर ओळख अधिक मजबूत झाली आहे. आलिया भट्ट आणि प्रियंका चोप्रा यांनी अभिनयातच नव्हे, तर सामाजिक जबाबदारी पार पाडण्यातही आपली वेगळी छाप निर्माण केली आहे. त्यामुळे त्यांचा हा सन्मान भारतासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.





## "धुरंधर 2 ची धमाकेदार एन्ट्री! प्रीव्ह्यूतच 44 कोटींची कमाई, देशभरात हाऊसफुल्ल शो"

सध्या सर्वत्र चर्चा आहे धुरंधर 2 ची. पहिला भाग रिलीज झाल्यानंतर दुसरा भाग कधी रिलीज होणार याकडे प्रेक्षक डोळे लावून बसले होते. अखेर आज तो दिवस आला असून, 19 मार्च रोजी देशभरातील चित्रपटागृहात धुरंधर 2 रिलीज झाला आहे.त्याअगोदरच चित्रपटाने मोठा इतिहास रचत बॉलिवूडच्या अनेक चित्रपटांचे रेकॉर्ड मोडीत काढले आहे.18 मार्च या दिवशी ठिकठिकाणी धुरंधर 2 च्या प्री पेड शोजचे आयोजन करण्यात आले होते. या शोजचे तिकीट वाढीव दराने असूनही चित्रपटाची क्रेझ पाहता तुफान प्रतिसाद प्रेक्षकांनी दिला.त्यामुळे धुरंधर 2 ला इतर भारतीय चित्रपटापेक्षा आजवरची सर्वात मोठी 'पेड प्रिव्ह्यू स्क्रीनिंग' स्केल देण्यात आली.केवळ भारतातच 6000 स्क्रीन्सवर या चित्रपटाचे 9000 शोज रिलीज करण्यात आले आहेत.कडील आकडेवारीनुसार, 'धुरंधर: द रिव्हेंज' या चित्रपटाने 18 मार्च 2026 रोजी रिलीज झालेल्या आपल्या 'पेड प्रिव्ह्यू' शोजमधून भारतात 44 कोटींची निव्वळ कमाई केली आहे. यावरुन दिसून येते की या सिनेमाने 2025 मध्ये रिलीज झालेल्या पहिल्या भागाला मागे टाकले आहे. धुरंधरने रिलीजच्या पहिल्या दिवशी 28 कोटींची कमाई केली असून, एकूण 52.71 कोटी रुपये कमावले आहेत.महत्वाची बाब म्हणजे तिकिटाचा दर अधिक असतानाही प्रेक्षकांचा प्रतिसाद जबदस्त आहे. अनेक चित्रपटगृहातील शोज हाऊसफुल्ल झाले आहेत.धुरंधरच्या पहिल्या भागाची जागतिक स्तरावर एकूण कमाई 1300 कोटी इतकी झाली होती. त्यामुळे धुरंधर 2 हा आकाडा ओलांडू शकले का हे पाहणे महत्वाचे असणार आहे. आणखी एक रेकॉर्ड, या चित्रपटाची क्रेझ पाहत आणि चाहत्यांची प्रचंड डिमांड यामुळे अनेक थिएटर्सनी रात्री उशिराचे शोदेखील सुरू केले आहेत. तर मुंबईच्या प्रसिद्ध मराठा मंदिरनेही आपली जुनी परंपरा मोडली आहे. धुरंधरसाठी 30 वर्षांत पहिल्यांदाच दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे चित्रपटाच्या वेळेत बदल करण्यात आला आहे.

# विश्वविजयानंतर गौतम गंभीरचा मोठा निर्णय!

## १६ सोशल मीडिया अकाउंट्सविरोधात खटला, २.५ कोटींची नुकसानभरपाई मागणी

महाईन्यूज । नवी दिल्ली

**प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कर्णधार सूर्यकुमाक यादवच्या नेतृत्त्वाखाली भारताने टी-२० विश्वचषक २०२६ चं जेतेपद आपल्या नावे केलं. भारताने सलग दुसऱ्यांदा या स्पर्धेचं जेतेपद पटकावलं. याशिवाय मायदेशात टी-२० विश्वचषक जिंकणारा भारत जगातील पहिला देश ठरला. या विजयात भारताच्या सर्वच खेळाडूंचं उत्कृष्ट योगदान होतं. तर कोच गौतम गंभीरने मोक्याची क्षणी योग्य निर्णय घेत संघाच्या विश्वचषक विजयात मोलाची भूमिका बजावली. दरम्यान आता गंभीरने कोर्टात धाव घेतली आहे.**



### "गंभीरचा १६ अकाउंट्स विरोधात खटला"

गौतम गंभीरने JANKEY FRAMES, BHUPENDRA PAINTOLA, LEGENDS REVOLUTION, GUSTAKHEDITS, CRICKET_MEMER45, GEMSOFCRICKETS, CRICKAIITH, SUNNY UPADHYAY, आणि @ IMRAVY_ यांसह अनेक सोशल मीडिया अकाऊंट्सविरुद्ध खटला दाखल केला आहे.

भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर हे सोशल मीडियावर त्यांच्या विरोधात पसरवल्या जाणाऱ्या खोट्या आणि बनावट बातम्या व दाव्यांमुळे त्रस्त झाले आहेत. त्यामुळेच त्यांनी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलून दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. दिल्ली उच्च न्यायालयात गुन्हा दाखल करताना गौतम गंभीर यांनी आरोप केला आहे की, त्यांच्या नावाचा आणि ओळखीचा गैरवापर केला जात आहे आणि त्यांच्या विरोधात खोटे दावे पसरवले जात आहेत

गौतम गंभीरने १६ इंस्टाग्राम अकाऊंट्सविरुद्ध आणि अज्ञात व्यक्तींविरुद्ध खटला दाखल केला आहे. त्याने हा खटला दिल्ली उच्च न्यायालयाच्या कमर्शियल डिव्हिजनमध्ये दाखल केला आहे. त्याने २.५ कोटी रुपयांच्या नुकसान भरपाईचीही मागणी केली आहे.

गौतम गंभीर यांनी आपल्या तक्रारीत म्हटलं आहे की, २०२५ च्या अखेरीपासून यूट्यूब, एक्स, इन्स्टाग्राम आणि फेसबुकवर त्यांच्या नावाने बनावट डिजिटल व्हीडिओ-फोटो तयार करण्यात आले आहेत. एआय, चेहरा बदलणे आणि आवाजाची नक्कल करणे यांसारख्या तंत्रांचा वापर करून त्यांच्या नावाने अनेक बनावट व्हिडिओ तयार करण्यात आले आहेत, ज्यात ते अशी विधाने करताना दिसत आहेत जी त्यांनी कधीही केलेली नाहीत. त्यांच्या नावाने एक बनावट राजीनाम्याचा व्हिडिओ पोस्ट करण्यात आला, ज्याला २९ लाख व्ह्यूज मिळाले. दुसऱ्या एका क्लिपमध्ये गंभीर वरिष्ठ क्रिकेटपटूंबद्दल अशी टिप्पणी करताना दिसले, जी त्यांनी कधीही केली नव्हती.

गंभीरने २.५ कोटी नुकसान भरपाईची मागणी केली आहे. याशिवाय कोच गंभीरने या सोशल मीडिया अकाऊंटवरून आपली खोटी माहिती काढून टाकण्याची मागणीही केली आहे. गौतम गंभीरने आपल्या दाव्यात म्हटलं आहे की, अज्ञात अकाऊंट्सने चुकीची माहिती पसरवण्यासाठी आणि त्यातून पैसे कमावण्यासाठी त्याची ओळख, नाव, चेहरा आणि आवाजाचा वापर केला आहे. यामुळे गंभीरला त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करावा लागला.

# गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर दिनेश कार्तिकच्या घरी 'लक्ष्मी'चं आगमन!

महाईन्यूज । नवी दिल्ली

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) साठी २०२६ चा आयपीएल हंगाम खास असणार आहे. गतविजेते म्हणून संघ मैदानात उतरत आपलं जेतेपद कायम राखण्याचा प्रयत्न करतील. दरम्यान, संघाचे मार्गदर्शक आणि फलंदाजी प्रशिक्षक, दिनेश कार्तिक यांनी गुढीपाडव्याच्या दिवशी चाहत्यांसह एक आनंदाची बातमी शेअर केली आहे. दिनेश कार्तिक आणि दिपिका पल्लीकल हे लेकीचे आईबाबा झाले आहेत.**



### दिनेश कार्तिकने आपल्या लेकीचं नाव काय ठेवलं?

दिनेश कार्तिकच्या जुळ्या मुलांची नावं कबीर व झियान अशी आहेत. यानंतर जोडप्याने त्यांच्या लेकीचं नाव 'राहा पल्लीकल कार्तिक' असं ठेवलं आहे. हॅलो बेबी गर्ल असं कॅप्शन देत कार्तिकने ही पोस्ट शेअर केली असून यावर कमेंट्स आणि लाईक्सचा पाऊस पाडला आहे. विराट कोहलीने देखील दिनेश कार्तिकच्या लेकीच्या या पोस्टवर हार्ट इमोजीसह कमेंट केली आहे.

दिनेश कार्तिक यांची पत्नी दीपिका पल्लीकल हिने गोंडस मुलीला जन्म दिला आहे. आज १९ मार्च रोजी कार्तिकने स्वतः आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर पोस्ट शेअर करत ही आनंदाची आणि उत्साहवर्धक बातमी चाहत्यांसोबत शेअर केली. ही बातमी समोर येताच चाहत्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत असून, कार्तिक कुटुंबासाठी हा अत्यंत आनंदाचा, भावनिक आणि खास क्षण ठरला आहे. याचबरोबर दिनेश कार्तिकने आपल्या लेकीचं नाव देखील जाहीर केलं आहे.

आधीच जुळ्या मुलांचा आनंद अनुभवलेले दिनेश कार्तिक आणि दीपिका पल्लीकल आता त्यांच्या छोट्या लेकीचं कुटुंबात मनापासून स्वागत करत आहेत.

दिनेश कार्तिक आणि दीपिका पल्लीकल यांनी २०१३ मध्ये साखरपुडा केला होता, त्यानंतर २०१५ साली त्यांनी विवाहबंधनात अडकत आपल्या आयुष्याची नवी सुरुवात केली. विशेष म्हणजे त्यांचे लग्न दोन वेगवेगळ्या पद्धतींनी पार पडले होते—१८ ऑगस्ट रोजी ख्रिश्चन पद्धतीने आणि २० ऑगस्ट रोजी पारंपरिक हिंदू पद्धतीने. २०२१ मध्ये या जोडप्याच्या आयुष्यात झियान आणि कबीर या जुळ्या मुलांचे आगमन झाले होते. आता या गोंडस लेकीच्या जन्मामुळे त्यांच्या कुटुंबातील आनंद द्विगुणित झाला असून घरात आनंदाचे आणि उत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दीपिका पल्लीकल ही भारतातील आघाडीची स्क्वॅश खेळाडू असून तिने आपल्या खेळात मोठं यश मिळवलं आहे. तसेच तिने दिनेश कार्तिकच्या क्रिकेट कारकिर्दीतही महत्त्वाची साथ आणि पाठिंबा दिला आहे.

दिनेश कार्तिकची क्रिकेट कारकीर्द नेहमीच चर्चेचा विषय राहिली आहे. त्याने आयपीएलमध्ये अनेक हंगामांमध्ये रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (आरसीबी) संघाकडून खेळताना एक विश्वासार्ह फिनिशर म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

त्याच्या निर्णायक फलंदाजीमुळे संघाला अनेक सामने जिंकण्यात मदत झाली आहे. क्रिकेटमधून निवृत्तीनंतर त्याने कोचिंग आणि मार्गदर्शनाची भूमिका स्वीकारली असून, त्याचा अनुभव आणि मार्गदर्शन संघातील तरुण फलंदाजांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. आयपीएल २०२६ च्या हंगामात आरसीबीची फलंदाजी अधिक भक्कम करण्यामध्ये तो महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे मानले जात आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

epaper.mahaenews.com

ePaper

। शुक्रवार ।
दि. 20 मार्च 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पिंपरी-चिंचवडमध्ये सिंगल यूज प्लास्टिकवर कारवाई!

## २१,५०० रुपयांचा दंड वसूल; नियमांचे पालन करण्याचे महापालिकेचे आवाहन

**महाईन्यूज** । पिंपरी चिंचवड

**सिंगल यूज प्लास्टिकचा वाढता वापर पर्यावरणासाठी गंभीर धोका ठरत असून, वारंवार सूचना देऊनही नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पिंपरी चिंचवड महापालिकेकडून कडक कारवाई सुरू करण्यात आली आहे. या अनुषंगाने महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या पथकाने ब क्षेत्रीय कार्यालय, प्रभाग क्रमांक १७ अंतर्गत विविध ठिकाणी कारवाई करीत २१ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल केला आहे.**



> वसुंधरेचे संरक्षण आणि शहराची स्वच्छता ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. सिंगल यूज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळणे आवश्यक असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर महापालिकेकडून यापुढेही कडक कारवाई केली जाईल. नागरिकांनी स्वच्छता नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे.
> – डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल आणि सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिकचा वापर करणाऱ्यांवर कडक मोहीम राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने आरोग्य विभागाच्या ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या प्रभाग क्रमांक १७ येथे सार्वजनिक ठिकाणी बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर करणारे तसेच अस्वच्छता पसरविणारे नागरिक आणि व्यावसायिकांवर कठोर कारवाई करण्यात आली. प्लास्टिकचा वापर, सार्वजनिक ठिकाणी घाण करणे व थुंकणे या प्रकारांबाबत दंड आकारण्यात आला.

या कारवाईमध्ये ५ हजार रुपयांची ३ प्रकरणे, २ हजार रुपयांचे १ प्रकरण, १ हजार रुपयांची ४ प्रकरणे आणि ५०० रुपयांचे १ प्रकरण अशा एकूण ९ प्रकरणांमध्ये एकूण २१ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. सहाय्यक आरोग्य अधिकारी सुधीर वाघमारे यांच्या अधिपत्याखाली आरोग्य निरीक्षक रुपाली साळवे यांच्या पथकाने ही कारवाई केली.शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी सातत्याने अशी कारवाई सुरू राहणार असून नागरिकांनी सिंगल यूज प्लास्टिकचा वापर टाळावा व स्वच्छता नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## धावडेवस्तीत 'वेस्ट टू आर्ट' उपक्रमाची रंगत; जनजागृतीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**महाईन्यूज** । पिंपरी चिंचवड

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'क' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक ०६, धावडेवस्ती येथे "स्वच्छ सर्वेक्षण २०२६" आणि "माझी वसुंधरा ६.०" अभियानाच्या पार्श्वभूमीवर 'वेस्ट टू आर्ट' या अभिनव उपक्रमांतर्गत जनजागृतीपर कार्यक्रम उत्साहात पार पडला. शहर स्वच्छतेसोबतच वसुंधरापूरक दृष्टीकोन रुजविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.**




या कार्यक्रमास महापौर रवि लांडगे, नगरसदस्या राजश्री लांडगे, माजी नगरसदस्य राजेंद्र लांडगे, मुख्य आरोग्य निरीक्षक सतीश इंगेवाड, वैभव घोळवे, आरोग्य निरीक्षक राजेंद्र उजिनवाल यांच्यासह इतर मनपा अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने आणि उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. कार्यक्रमाला नागरिकांचा उत्साही प्रतिसाद लाभल्यामुळे परिसरात एक सकारात्मक आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले होते.

भोसरी येथील कोंडीबा लांडगे मार्ग, धावडे वस्ती परिसरात सर्वप्रथम व्यापक आणि नियोजनबद्ध स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, नाले आणि परिसरातील कचरा हटवून संपूर्ण परिसर स्वच्छ, सुंदर आणि नीटनेटका करण्यात आला. नागरिकांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग घेत प्रशासनाला सहकार्य केले, ही या उपक्रमाची विशेष बाब ठरली.

यानंतर 'वेस्ट टू आर्ट' या संकल्पनेअंतर्गत टाकाऊ, निरुपयोगी आणि फेकून दिलेल्या वस्तूंमधून आकर्षक, उपयुक्त आणि सुंदर सजावटीच्या वस्तू तयार करण्यात आल्या. प्लास्टिक, कागद, टाकाऊ लोखंडी साहित्य, बाटल्या, टायर यांसारख्या वस्तूंचा वापर करून तयार करण्यात आलेल्या या कलाकृतींनी परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले. या सर्जनशील उपक्रमामुळे 'टाकाऊ वस्तूपासून कलाकृती' आणि 'कचऱ्याचे व्यवस्थापन हेच पर्यावरण रक्षण' हा संदेश नागरिकांपर्यंत प्रभावी, प्रेरणादायी आणि कृतीशील पद्धतीने पोहोचला.

यावेळी महापौर रवि लांडगे यांनी कार्यक्रमस्थळी प्रत्यक्ष भेट देत संपूर्ण उपक्रमाची पाहणी केली. त्यांनी नागरिकांशी संवाद साधत सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकण्याचे, ओला व सुका कचरा वेगळा करण्याचे तसेच शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी राखण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी पार पाडण्याचे आवाहन केले. तसेच परिसरातील आर.आर. आर. सेंटरची पाहणी करून पुनर्वापर, पुनर्निर्मिती आणि संसाधनांचा योग्य वापर याबाबत जनजागृती करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

कार्यक्रमादरम्यान उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सफाई सेवकांचा गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या मेहनतीची दखल घेत त्यांना प्रोत्साहन देण्याचा हा उपक्रम उपस्थितांच्या कौतुकाचा विषय ठरला. तसेच नागरिकांनीही सफाई कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

# आर्थिक दुर्बल कुटुंबांसाठी ७८०८ हक्काची घरे

## प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील कुटुंबांना मिळणार हक्काचे घर

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**पंतप्रधान आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये पिंपरी-चिंचवड शहरातील रावेत, मामुर्डी, पुनावळे, वडमुखवाडी, ताथवडे आणि चोविसावाडी या सहा ठिकाणी महापालिकेकडून गृहप्रकल्प राबविण्यात येणार आहेत. त्यासाठी जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. हे सहा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील ७ हजार ८०८ कुटुंबांना हक्काचे घर मिळणार आहे.**



वाद न्यायालयात गेल्याने आणि मुदतीमध्ये जागा ताब्यात न आल्याने रावेत येथील गृहप्रकल्प रद्द करण्यात आला होता. तेथील लाभार्थ्यांना किवळेतील खासगी गृहप्रकल्पात सदनिका देण्यात आल्या. प्रकल्प रद्द करण्याची नामुष्की ओढवलेल्या रावेत येथील गृहप्रकल्पाचा पंतप्रधान आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये समावेश करण्यात आला आहे. रावेत, मामुर्डी, पुनावळे, वडमुखवाडी, ताथवडे आणि चोविसावाडी या सहा ठिकाणी महापालिकेच्या वतीने ही योजना राबविण्यात येणार आहे. त्यांपैकी रावेत, पुनावळे, वडमुखवाडी, मामुर्डी येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी गृहप्रकल्प असणार आहेत. ताथवडे, चोविसावाडीत बेघरांसाठी (एचडीएच गटासाठी) प्रकल्प असणार आहे.

रावेत येथे एक हजार आठ, मामुर्डीत ८००, पुनावळेत एक हजार २००, वडमुखवाडीत एक हजार २००, ताथवडेत दोन हजार ४०० आणि चोविसावाडीत एक हजार २०० अशा सात हजार ८०८ सदनिकांच्या प्रकल्पांसाठी जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. जागा ताब्यात येताच निविदा प्रक्रिया राबवून कामाला सुरुवात केली जाईल, असे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पंतप्रधान आवास योजनेचे कार्यकारी अभियंता हरविंदरसिंह बन्सल यांनी सांगितले.

पंतप्रधान आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये शहरातील जास्तीत जास्त कुटुंबांना लाभ मिळणार आहे. वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेत वाढ करण्यात आली आहे. या योजनेत शहरातील झोपडपट्टीतील पात्र झोपडीधारकांचाही समावेश केल्याने शहरातील हजारो नागरिकांना या योजनेचा लाभ घेता येईल.

### यावेळी सदनिकेच्या क्षेत्रफळात पूर्वीपेक्षा जास्त वाढ करण्यात आली

पंतप्रधान आवास योजनेत दहा लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी पूर्वी तीन लाख रुपये उत्पन्नाची मर्यादा होती. ती आता वाढवून सहा लाख रुपये करण्यात आली आहे. सहा लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्या कुटुंबांना पंतप्रधान आवास योजनेत सदनिका खरेदी करता येतील. तसेच, पूर्वी ३० चौरस मीटर (३२३ चौरस फूट) चटई क्षेत्रफळाच्या (कार्पेट एरिया) सदनिका होत्या. आता क्षेत्रफळ वाढवल्याने ४५ चौरस मीटर (४८४ चौरस फूट) चटई क्षेत्रफळाच्या सदनिका असणार आहेत.

### पहिल्या टप्प्यात ३६६८ सदनिकांचे वितरण

महापालिकेने पहिल्या टप्प्यात पंतप्रधान आवास योजनेत बोऱ्हाडेवाडी, चऱ्होली, पिंपरीतील उद्यमनगर आणि आकुर्डीतील मोहननगर येथे गृहप्रकल्प उभारले आहेत. आर्थिक दुर्बल घटकांतील कुटुंबांना ३ हजार ६६८ सदनिकांचे वितरण करण्यात आले आहे. अंतिम टप्प्यात असलेल्या डुडुळगाव येथील गृहप्रकल्पातील १ हजार १९० सदनिकांची सोडत काढण्यात आली आहे.

# बी.जी. शिर्के कंपनीची बांधकाम क्षेत्रात झेप

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**पुणे महानगर परिसरात बांधकाम क्षेत्रात एक अभूतपूर्व कामगिरी समोर आली असून, केवळ १०० दिवसांत १४ मजली उंच निवासी इमारत उभी करत बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नोलॉजी प्रा. लि. यांनी इतिहास घडवला आहे. या विक्रमी कामगिरीची दखल घेत इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स कडून त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.**




पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने सेक्टर-१२, चिखली येथे तब्बल ६,४५२ घरांच्या प्रकल्पातील एका इमारतीचे काम अवघ्या १०० दिवसांत पूर्ण करण्यात आले. सुमारे ८०,४५३ स्क्वेअर फूट क्षेत्रफळ असलेल्या या इमारतीत अत्याधुनिक ३एस प्री-फॅब तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. हे तंत्रज्ञान भारत सरकारच्या केंद्रीय लोकनिर्माण विभागाकडून (BMTPC) मान्यताप्राप्त असल्याने या प्रकल्पाची गुणवत्ता आणि सुरक्षितता अधिक ठळकपणे अधोरेखित होते.या १४ मजली इमारतीतील प्रत्येक घर सुमारे ५२७.४३ स्क्वेअर फूट क्षेत्रफळाचे असून, दोन बेडरूमसह सर्व सोयी-सुविधांनी सुसज्ज आहे. रहिवाशांसाठी दोन लिफ्ट्स, अग्निशामक यंत्रणा, सौरऊर्जा प्रणाली, पाणीपुरवठा अशा अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

विशेष म्हणजे, एवढ्या वेगाने आणि गुणवत्तेची तडजोड न करता पूर्ण झालेल्या या प्रकल्पामुळे बांधकाम क्षेत्रात एक नवा मापदंड निर्माण झाला आहे. इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सचे प्रतिनिधी अशोक अदक यांनी प्रत्यक्ष पाहणी करून या कामगिरीची खातरजमा केली आणि १८ मार्च २०२६ रोजी कंपनीचे प्रतिनिधी श्री योगेश काजळे, श्री नितीन कदम आणि श्री जितेंद्र राक्षे यांना पदक व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले. पुण्यातील ही विक्रमी कामगिरी आता देशभरात चर्चेचा विषय ठरत असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर बांधकाम क्षेत्रात क्रांती घडू शकते, याचे जिवंत उदाहरण ठरली आहे.


# गुढीपाडव्याला माऊलींच्या समाधीवर वरद विनायकाचे रूप

**महाईन्यूज । आळंदी**

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी येथे माऊलींच्या समाधीवर अष्टविनायकांपैकी सातवा गणपती असलेल्या श्री वरद विनायक मंदिर यांच्या रूपाची आकर्षक चंदन ऊटी साकारण्यात आली. दरवर्षीप्रमाणे यंदाही गुढीपाडव्याच्या निमित्ताने माऊलींच्या समाधीवर विविध देवांची रूपे साकारण्याची परंपरा जपण्यात आली. यंदा अष्टविनायकातील वरद विनायकाचे रूप साकारल्याने वारकरी संप्रदाय आणि स्थानिक भाविकांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. ही मोहक चंदन ऊटी पुण्यातील प्रसिद्ध शिल्पकार अभिजीत धोंडफळे आणि मोरेश्वर जोशी यांनी आपल्या उत्कृष्ट कलाकुसरीतून साकारली. चंदनाच्या ऊटीसह केलेली सुबक पुष्पसजावट मंदिराच्या गाभाऱ्याला अधिकच विलोभनीय बनवत होती.




Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
43 YEARS OF
NURTURING VALUES,
EXCELLENCE AND
TOMORROW'S LEADERS.
ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade V
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in